# प्रकरण – 1 ले

## सातारा जिल्ह्याची
## भौगोलिक व ऐतिहासिक
## पार्श्वभूमी

प्रकरण – 1

## सातारा जिल्हयाची भौगोलिक स्थिती व ऐतिहासिक पार्श्वभूमी

### प्रास्तविक –

"सातारा" ही सातारा संस्थानची पर्यायाने मराठी राज्याची राजधानी होती. अनेक पराक्रमी लोक, स्वातंत्र्यवीर, सामाजिक विचारवंत, शिक्षणतज्ञ, नट कलाकार, समाज सुधारक या जिल्हयानेच महाराष्ट्राला दिले आहेत. सर्वच क्षेत्रात मोलाचा कायापालट घडवून आणून त्यांनी आपले नाव इतिहासात अजरामर केले आहे. पण भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत धडाडीने भाग घेणारे व स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करणारे दादासाहेब उंडाळकर हे एक सातारा जिल्हयातील महत्वपूर्ण असे व्यक्तिमत्व आहे. त्यांची प्रत्यक्ष कर्मभूमी म्हणजे सातारा जिल्हयातील कराड तालुक्यातील खेडी होय. त्यांमुळेच कराड तालुक्यातील खेडो–पाडयात त्यांच्या कार्याचे पडसाद उमटलेले दिसतात व या भागातील लोक त्यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील अमूल्य कार्याबद्दल आदर बाळगताना दिसतात.

अशा या जिल्हयात जन्माला आलेल्या दादासाहेब उंडाळकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेताना त्यांच्या कालखंडाचा विचार करणे आवश्यक आहे. यात सर्वसाधारणपणे सन 1901 ते सन 1974 या 73 (त्र्याहत्तर) वर्षांच्या कालखंडाचा विचार करणे आवश्यक आहे. या कालखंडातील भौगोलिक परस्थिती, ऐतिहासिक पार्श्वभूमी, तसेच उंडाळे गावाची पार्श्वभूमी याचा विचार करावा लागेल.

### सातारा जिल्हयाची भौगोलिक स्थिती

महाराष्ट्र राज्यातील सातारा हा एक जिल्हा आहे. सातारा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या पशिन्चम भागात आहे.

## सातारा जिल्ह्याची सीमा रेषा आणि व्याप्ती.

पश्चिमेस सह्याद्री पर्वत, उत्तरेला नीरा नदी व दक्षिणेला वारणानदी या तीन दिशांची सरहद्द सुमारे 300 वर्षापुर्वी म्हणजे सातारचे शाहू राजे व कोल्हापूरचे संभाजी राजे यांच्यात झालेल्या सन 1731 वारणेच्या तहातच निश्चित झाली होती. सातारा जिल्ह्याच्या पुर्वेला सोलापूर जिल्हा आहे. जुन्या अखंड सातारा जिल्ह्यात : 1) सातारा, 2) वाई, 3) कोरेगांव, 4) खटाव, 5) कराड, 6) पाटण, 7) वाळवे, 8) खानापूर, 9) तासगांव, 10) जावळी, 11) माण हे अकरा तालुके आणि खंडाळा, शिराळा, व महाबळेश्वर हे तीन महाल अगर पेटे एवढया प्रदेशांचा समावेश होत होता. पुर्वी छत्रपतींची राजधानी असलेले सातारा शहरच जिल्ह्याचे मुख्य ठिकाण होते. या शिवाय उत्तरेला फलटण संस्थान, पुर्वेला औंध संस्थानाचा आटपाडी तालुका आणि औंध सांगली, बुधगांव, कुरूंदवाड, अक्कलकोट या संस्थानांची जिल्हाभर विखुरलेली गावे होती. 1 ऑगष्ट, 1949 रोजी जुन्या सातारा जिल्ह्याचे विभाजन करून वाळवा, तासगांव, खानापूर हे तालुके व शिराळा पेटा आणि मिरज, आटपाडी, जत कवठे–महंकाळ हे संस्थानी मुखलाखे तालुके एकत्र करून नविन दक्षिण सातारा जिल्हा बनविण्यांत आला. नंतर 1960 मध्ये या जिल्ह्याला सांगली जिल्हा हे नांव देण्यांत आले. 1

विभाजनानंतर सातारा जिल्ह्याची पूर्व–पश्चिम लांबी 90 मैल असून दक्षिण–उत्तर लांबी 75 मैल आहे. सातारा जिल्ह्याच्या उत्तरेस पुणे जिल्हा आहे. पुर्वेस सोलापूर व दक्षिणेस सांगली जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेस रत्नागिरी जिल्हा असून वायव्येस रायगड जिल्हा आहे. सातारा जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ

4,022.6 चौरस मैल इतक आहे. 2

## सातारा जिल्ह्याची प्राकृतिक रचना

सातारा जिल्ह्यात विविध भूरूपे आहेत. महादेव बामणोली या डोंगर रांगा तसेच सीताबाई औंध, आगाशिवा इत्यादी डोंगर जिल्ह्यात आहेत. जिल्ह्याच्या पश्चिम भागात सह्याद्री पर्वत आहे. जिल्ह्यात खंबाटकी, पसरणी, कुंभार्ली, हातलोट, पार इत्यादी घाट असून महाबळेश्वर, पांचगणी ही उंचावरील पठारेही आहेत. सातारा जिल्ह्याचे प्राकृतिक रचनेनुसार चार भाग पडतात :

1) **सह्याद्री पर्वताचा प्रदेश** :

यात वाई व पाटण तालुक्यांचा पश्चिम भाग तसेच जावळी व महाबळेश्वर तालुक्याचा भाग येतो.

2) **कृष्णा नदीच्या खोऱ्याचा प्रदेश** :

जिल्ह्याच्या मध्यभागातून कृष्णा नदी वाहते. वाई, सातारा व कराड हे तालुके तिच्या काळच्या प्रदेशात आहेत.

3) **नीरा नदीच्या खोऱ्याचा प्रदेश** :

जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरून नीरा नदी वाहते. खंडाळाव फलटण तालुक्यांचा या प्रदेशात समावेश होतो.

4) **पुर्वेकडील टेकड्यांचा प्रदेश** :

हा प्रदेश सपाट आहे. खटाव व माण तालुक्याचा भाग यात येतो. या भागात

लहान–लहान डोंगर व टेकड्या आहेत.

## सातारा जिल्ह्यातील प्रमुख नद्या

"कृष्णा" ही सातारा जिल्ह्यातील मुख्य नदी आहे. तिचा उगम महाबळेश्वराच्या पठारावर होतो. ती जिल्ह्यातून दक्षिणेकडे वाहत जाते. वाई, पांचवड, माहुली, उंब्रज, कराड ही कृष्णे काठची जिल्ह्यातील प्रमुख गांवे आहेत. व कुडाळी वेण्णा, उरमोडी, तारळी, कोयना या तिच्या प्रमुख उपनद्या आहेत. कुडाळी नदी पाचवड जवळ कृष्णेला मिळते. वेण्णा नदी माहुलीजवळ कृष्णेला मिळते. उरमोडी नदी जावळीतील कास जवळ उगम पावते व सातारा तालुक्यातील वेणेगांव येथे कृष्णेला मिळते. तारळी नदी पाटण तालुक्यातील तारळे गावाजवळ उगम पावते व कराड तालुक्यातील उंब्रज जवळ कृष्णेला मिळते. कोयना नदी महाबळेश्वराच्या पठारावर उगम पावते व कराड जवळ कृष्णेला मिळते. केरा, वांग व मोरणा या कोयनेच्या उपनद्या आहेत. याशिवाय वसना ही नदी कोरेगांव तालुक्याच्या उत्तरेला सोळशी या ठिकाणी उगम पावते व कोरेगांव तालुक्यातील मंगळापूर या ठिकाणी कृष्णेला मिळते. 3

कृष्णा नदी व तिच्या उपनद्यामुळे काठचा प्रदेश सुपीक मैदानाचा झाला आहे. याशिवाय येरळा नदी खटाव तालुक्यातून वाहते व नंतर खानापूर तालुक्यात प्रवेश करते. नीरा नदी वाई, खंडाळा, फलटण तालुक्यातून वाहते नंतर सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांबवे गावाजवळ भिमेला मिळते. बाणगंगा ही नदी नीरेची उपनदी आहे. याशिवाय माणगंगा नदी माण तालुक्यातून वहाते व सोलापूर जिल्ह्यातील सरकोली येथे भीमेला मिळते. माण तालुक्यातील मलवडी,

आंधळी, दहिवडी, म्हसवड इत्यादी प्रमुख गांवे माणगंगा नदीच्या काठी आहेत. 4

## सातारा जिल्ह्याचे हवामान

सातारा जिल्हा सह्याद्री पर्वताच्या पुर्वेस आहे. त्यामुळे जिल्ह्याचे हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्याचा पश्चिम भाग उंच व डोंगराळ असल्यामुळे उन्हाळयातही तेथील हवामान थंड असते. 5 सर्वसाधारणपणे सातारा जिल्ह्यात कमाल तपमान $30.3^0$ व किमान तपमान $19.0^0$ इतके असते. 6

सातारा जिल्ह्यात महाबळेश्वर, जावळी व पाटण तालुक्यात जास्त पाऊस पडतो. तर खंडाळा, फलटण, खटाव व माण या तालुक्यात कमी पाऊस पडतो. इतर तालुक्यात मध्यम पाऊस पडतो.

## सातारा जिल्ह्यातील प्रमुख पिके

सातारा जिल्ह्यात पिकांचे दोन हंगाम आहेत.

1) **खरीप हंगाम** :

खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, तांदूळ, भुईमुग, कडधान्ये इत्यादी पिके घेतली जातात.

2) **रब्बी हंगाम** :

रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरबरा इत्यादी पिके घेतली जातात.

3) **बागायती पिके** :

सातारा जिल्ह्यात ऊस, फळे, भाजीपाला इत्यादी महत्वाची पिके घेतली

जातात.

सातारा जिल्ह्यात सध्या पाणीपुरवठ्याच्या सोयी वाढलेल्या असल्याने ऊस, फळे, भाजीपाला इत्यादी रोखा पैसा देणारी पिके घेण्याकडे लोकांचा कल वाढलेला आहे. त्यामुळे या पिकांच्या लागवडी खालील क्षेत्र दिसवेंदिसव वाढत आहे. सध्या फलोत्पादन शेतीकडे लोकांचा जास्त कल असल्याचे दिसून येते.

## सातारा जिल्ह्यातील प्रमुख किल्ले

### 1) प्रतापगड :

उंची 3543 फूट इतकी आहे. महाबळेश्वराच्या पश्चिमेस आठ मैलावर हा किल्ला आहे. किल्ल्याचे बांधकाम 1656 मध्ये झाले. अफझलखानाचे पारिपत्य शिवरायांनी येथेच केले. येथील भवानीचे मंदिर, हनुमान मंदिर, शिवाजी महाराजांचा पुतळा पहाण्यासारखे आहेत. 7

### 2) सज्जनगड :

हा किल्ला साताऱ्याच्या नैऋत्येस सहा मैलावर आहे. उंची 1045 फुट आहे. शिलाहार राजानी हा किल्ला 10–11 व्या शतकात बांधला असावा. 1673 मध्ये शिवाजी महाराजांनी विजापूराकडून हा किल्ला घेतला. व पौष शुद्ध नवमी शके 1595 ह्या दिवशी समर्थ रामदास स्वामी येथे कायमचे रहावयास आले. त्यामुळे पुष्कळ साधू, संत येथे येऊ लागल्यामुळे सज्जनगड हे नांव पडले. **8**

### 3) सातारा किल्ला (अजिंक्यतारा) :

या किल्ल्याची समुद्र सपाटी पासूनची उंची 3220 फुट इतकी असून सातारा

शहरापेक्षा हा किल्ला अंदाजे 900 फुट उंच आहे. सन 1190 च्या सुमारास शिलाहार कुळातील दुसऱ्या भोज राजाने हा किल्ला बांधला असावा. सन 1698 मध्ये रामचंद्र पंत अमात्याने सातारा किल्ल्यावर मराठ्यांची राजधानी नेली. 9

4) **कमलगड** :

हा किल्ला वाईच्या पश्चिमेस 10 मैलावर आहे. किल्ल्याची उंची 4511 फुट आहे.

5) **केंजळगड** :

हा किल्ला वाईच्या वायव्येस 11 मैलावर आहे. किल्ल्याची उंची 4269 फुट आहे. 12 व्या शतकात भोज राजाने हा किल्ला बांधला. 10

6) **सुंदरगड** :

हा किल्ला पाटणच्या वायव्येस तीन मैलावर आहे. किल्ल्याची उंची 2000 फुट व क्षेत्रफळ तीन एकर आहे.

7) **कल्याणगड** :

हा किल्ला कोरेगांवच्या उत्तरेस आठ मैलांवर आहे. किल्ल्याची उंची 3537 फुट आहे. पन्हाळ्याच्या दुसऱ्या शिलाहार भोजने हा किल्ला बांधला. 1673 मध्ये तो शिवाजीच्या ताब्यात गेला. 11

8) **भैरवगड** :

हा किल्ला पाटणच्या नैऋत्येस 20 मैलावर आहे. क्षेत्रफळ 5 एकर.

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

किल्ल्यावर भैरवाचे देऊळ आहे त्यावरून भैरवगड हे नांव पडले.

9) **मकरंदगड** :

हा किल्ला महाबळेश्वराच्या नैऋत्येस सात मैलावर आहे. उंची 4054 फुट. 1656 च्या सुमारास शिवाजीने हा किल्ला बांधला. 13

वरील किल्ल्याच्या शिवाय सातारा जिल्ह्यात गुणवंतगड, चंदन–वंदन, जंगली जयगड, ताथवडे उर्फ संतोषगड, पांडवगड, भूषणगड, महिमानगड, वैराटगड, वर्धनगड, वसंतगड, वारूगड, सदाशिवगड, वासोटा हे किल्ले आहेत. या किल्ल्यांचा शिवाजी महाराजांना स्वराज्य रक्षणासाठी फार उपयोग झाला.

## सातारा जिल्ह्यातील उद्योग धंदे

सातारा जिल्ह्यातील उद्योग धंद्याचा इतिहास 1916 पासून सुरू होतो.

1916 मध्ये ओगलेवाडी येथे काच कारखाना सुरू झाला. 13 आज अनेक प्रकारचे छोटे व मोठे उद्योग–धंदे जिल्ह्यात चालतात.

**छोटे उद्योग** :

सातारा जिल्ह्यात तेल गाळणे, गूळ तयार करणे, हातमागावर कापड विणणे इ. छोटे उद्योग चालतात. खटाव, माण व फलटण तालुक्यात लोकरीच्या घोंगड्या विणण्याचा उद्योग चालतो. महाबळेश्वर तालुक्यात मध उद्योग महत्वाचा आहे.

**मोठे उद्योग** :

जिल्ह्यात अनेक प्रकारचे मोठे उद्योग आहेत. सातारा तालुक्यात सातारा रोड

व जरंडेश्वर येथे लोखंडाचा कारखाना आहे. कोरेगांव येथे तेल गिरणी आहे. सातारा येथे स्कुटर, सुटकेस, औषधे इ. वस्तूंचे कारखाने आहेत. फलटण येथे जिनींग व प्रेसिंग उद्योग आहेत. जिल्ह्यात सातारा, कराड, फलटण, वाई इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती आहेत. **14**

**साखर उद्योग** :

साखर उद्योग हा सातारा जिल्ह्यातील एक महत्वपूर्ण उद्योग आहे. या उद्योगामुळे अनेक लोकांना रोजगार मिळतो. सातारा जिल्ह्यात फलटण, यशवंतनगर (कराड), भुईंज, शेंद्रे, मरळी, साखरवाडी व रेठरे बुद्रुक येथे सहकारी साखर कारखाने आहेत.

## सातारा जिल्ह्यातील प्रमुख रस्ते व लोहमार्ग

**रस्ते** :

**1) पुणे–बंगळूर राष्ट्रीय महामार्ग** :

हा राष्ट्रीय महामार्ग सातारा जिल्ह्याच्या उत्तर सीमेवर सालोरे गावाजवळ जिल्ह्यात प्रवेश करतो. हा महामार्ग या जिल्ह्यातील खंडाळा, वाई, मेढे, सातारा, कराड या तालुक्यातून जातो. या महामार्गाची जिल्ह्यातील एकूण लांबी 80.63 मैल इतकी आहे. शिरवळ, उंब्रज, कराड, वाठार ही महत्वाची गावे या महामार्गावर आहेत. **15**

**2) पोलादपूर–महाबळेश्वर–सुरूल राज्यमार्ग** :

हा मार्ग सुरूल पासून निघून पश्चिमेकडे आंबेनळी पसरणी घाटातून रायगड जिल्ह्यात जातो. हा मार्ग वाई, जावळी, महाबळेश्वर तालुक्यातून जातो. या मार्गावर वाई, पांचगणी, महाबळेश्वर ही महत्वाची ठिकाणे आहेत. 16

3) **गुहागर–चिपळूण–कराड–विजापूर राज्यमार्ग** :

हा मार्ग घाटमाथ्यावर बापोली जवळ सातारा जिल्ह्यात प्रवेश करतो. हा मार्ग जिल्ह्यातील पाटण व कराड तालुक्यातून जातो व सुर्ली गावाजवळ सांगली जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गावर कुंभार्ली घाट आहे. हेळवाक, पाटण, मल्हारपेठ, कराड, ओगलेवाडी ही या मार्गावरील महत्वाची ठिकाणे आहेत. 17

4) **महाड–पंढरपूर राज्यमार्ग** :

हा मार्ग शिरवळ जवळ सातारा जिल्ह्यात प्रवेश करतो आणि धर्मपूरी जवळ सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करतो. या मार्गावर शिरवळ, लोणंद, तरडगांव व फलटण ही महत्वाची गांवे आहेत.

5) **सातारा–पंढरपूर मार्ग** :

हा मार्ग सातारा, कोरेगांव, माण, खटाव तालुक्यातून जातो. या मार्गावर माहूली, कोरेगांव, पुसेगांव, गोंदवले, म्हसवड ही महत्वाची गांवे आहेत. 18

6) **सातारा–महाबळेश्वर मार्ग** :

या मार्गावर कन्हेर, मेढा, आंबेघर, केळघर ही महत्वाची गांवे आहेत.

7) **मल्हारपेठ–पंढरपूर रोड** :

या मार्गावर चरेगांव, उंब्रज, वडोली भिकेश्वर, मसूर, म्हासुर्णे, मायणी ही

महत्वाची गावे आहेत. 19

या शिवाय तालुक्यांची गावे व इतर गावांना जोडणारे अनेक रस्ते जिल्ह्यात आहेत.

## :::: रेल्वे (लोहमार्ग) ::::

रेल्वे मार्गाच्या बांधकामास या जिल्ह्यात 1884 मध्ये सुरुवात होऊन 1887 मध्ये बांधकाम पूर्ण झाले.

पुणे–बंगळूर हा रेल्वे मार्ग नीरा जवळ सातारा जिल्ह्यात प्रवेश करतो. जिल्ह्यातील लोहमार्गाची एकुण लांबी 74 मैल आहे. हा मार्ग फलटण, खंडाळा, कोरेगांव, कराड या तालुक्यातून जातो. या मार्गावर सातारा जिल्ह्यातील 14 रेल्वे स्थानके आहेत. त्यामध्ये लोणंद, वाठार, सातारा, कोरेगांव, रहिमतपूर, मसूर, कराड ही रेल्वे स्थानके महत्वाची आहेत. 20

## :::::: सातारा जिल्ह्यातील महत्वाची ठिकाणे ::::::

## |||| गावे – शहरे – तीर्थ क्षेत्रे ||||

**1951 च्या जनगणनेनुसार सातारा जिल्ह्यात 1152 खेडी व 15 मोठी गावे आहेत.** त्यापैकी अनेक ऐतिहासिक ठिकाणे आहेत. पवित्र तीर्थ क्षेत्रे आहेत व इतर महत्वाची गावे आहेत.

### 1. सातारा

जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. येथील प्रमुख प्रेक्षणिय ठिकाणे – राजवाडे, जलमंदिर, अजिंक्यतारा किल्ला, रयत शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यालय, सैनिक शाळा, छत्रपती शिवाजी

महाराज वस्तू संग्रहालय, चार भिंती, कास तलाव इ.

2. **<u>कराड</u>**

प्रमुख प्रेक्षणीय ठिकाणे – कृष्णा–कोयना प्रितीसंगम, कृष्णाबाई, काशी विश्वेश्वर मंदिरे, संत सखूची समाधी, 106 फुट उंचीचे मनोरे, यशवंतराव चव्हाण समधी स्थळ, आगाशिवा डोंगरातील बौध्द लेणी इ. कराड येथील प्रितीसंगम व कराड गांव एक पवित्र क्षेत्र म्हणून हजारे वर्षे मानले जात आहे. सहदेवाने दिग्विजय करताना करंहाटक जिंकले. असा महाभारतात उल्लेख आढळतो. पुराणात करहाटक क्षेत्र प्रसिध्द आहे. 21

3. **<u>फलटण</u>**

हे गाव जैन मंदिराबद्दल प्रसिध्द आहे. महानुभव वाङःमयात पालीठाण म्हणून फलटणचा उल्लेख आहे. येथील रामाचे देऊळ प्रसिध्द आहे. 22

4. **<u>महाबळेश्वर</u>**

हे प्रसिध्द थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणची उंची 4,710 फुट इतकी आहे. क्षेत्र महाबळेश्वर येथील डोंगरातून सात प्रवाह बाहेर येतात. या प्रवाहांना कृष्णा, वेण्णा, कोयना, गायत्री, सावित्री, भागिर्थी, सरस्वती अशी नावे आहेत. ह्या सर्व नदंयाचे पाणी एका कुंडात एकत्र आले असून त्याला ब्रह्म कुंड असे नाव दिले आहे.23

5. **<u>माहूली</u>**

येथे कृष्णा व वेण्णा या नदंयाचा संगम झाला आहे. त्यामुळे हे पवित्र क्षेत्र आहे.

6. **वाई**

हे प्राचीन काळापासून पवित्र म्हणून समजले गेलेले क्षेत्र आहे. येथे प्राचीन काळी पांडव वनवासात असताना रहात होते. येथेच भीमाने किचकाला ठार केले अशी दंतकथा आहे. येथील कृष्णा नदीवरील घाट व गणपतीचे मंदिर प्रसिध्द आहे. **24**

7. **शिंगणापूर**

येथील शंभू–महादेवाचे मंदिर प्रसिध्द आहे.

8. **औंध**

येथील यमाई मंदिर व वस्तूसंग्रहालय प्रसिध्द आहे.

9. **चाफळ**

येथील राम मंदिर प्रसिध्द आहे.

10. **पाल (खंडोबाची)**

कराडच्या वायव्येस 20 मैलावर हे गाव आहे. येथील खंडोबाचे मंदिर प्रसिध्द आहे.

11. **म्हसवड**

येथील सिध्दनाथाचे मंदिर प्रसिध्द आहे.

वरील ठिकाणांच्या शिवाय इतर अनेक तिर्थक्षेत्रे प्रेक्षणीय स्थळे व इतर महत्वाची गावे सातारा जिल्ह्यात आहेत.

## :::::: सातारा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी ::::::

प्राचीन काळात म्हणजे मौर्य काळानंतर सातारा जिल्ह्यातील प्रदेशावर सातवाहनांचे राज्य होते. त्यांच्या नंतर या प्रदेशातचुतुस राजाना राज्य केले. त्यांच्या नंतर इ.स. 550 ते 753 या काळात बदामीच्या चालुक्य राजांची सत्ता या प्रदेशावर होती. 25 चालुक्य राजांच्या नंतर राष्ट्रकुट सत्ता या प्रदेशावर होती. राष्ट्रकुट राजानी येथे 12 व्या शतकापर्यंत राज्य केले. त्या नंतर शिलाहार राजानी येथे 12 व्या शतकापर्यंत राज्य केले. 12 व्याशतकात देवगिरीचे यादव प्रबळ झाले. त्यानी हा प्रदेश जिंकून घेऊन आपल्या साम्राज्यातील एक प्रांत बनविला. यादवांचे हे राज्य 13 व्या शतकापर्यंत टिकले. 1296 मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर स्वारी करुन यादवांचा पाडाव केला. 1318 मध्ये देवगिरीचे राज्य नष्ट केले. तेव्हा या भागात दिल्लीहून सुभेदार नेमण्याची पध्दत सुरु झाली.

नंतर हसन गंगु वहामती याने 1347 मध्ये बहामनी राज्याची स्थापना केली. पुढे 1489 मध्ये बहामनी राज्याचे पाच शाह्यामध्ये विभाजन झाले तेव्हा हा प्रदेश आदिलशहाच्या ताब्यात आला. पुढे 17 व्या शतकात शिवाजी महाराजानी स्वराज्याची स्थापना केली. 1656 मध्ये शिवाजी महाराजानी जावळी जिंकली. नंतरच्या काळात सात–याचा हा प्रदेश भौगोलिक परीस्थितीमुळे अतिशय महत्वाचा ठरला. संभाजी महाराजांच्या वधा नंतर मराठ्यांचे औरंगजेबाविरुध्द जे स्वातंत्र्य युध्द सुरु झाले त्यावेळी सात–याचा अजिंक्यतारा व आस–पासचा प्रदेश विशेष महत्वाचा ठरला. 1707 साली औरंगजेब बादशहाच्या मृत्यूने मराठयांचे स्वातंत्र्य युध्द संपले. पुढे मोगलांच्या कैदेतून शाहूची सुटका झाली. सुरवातीला ताराबाईने शाहू राजांना विरोध केला परंतू अनेक सरदार

शाहू राजांना मिळाल्यामुळे त्यांचे पारडे जड झाले. त्यानी ताराबाईचा पराभव केला. 1708 मध्ये सातारा जिंकले व येथेच स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. त्यावेळे पासून ते 1848 पर्यंत मराठयांची राजधानी म्हणून हे शहर प्रसिध्द होते. स्वतः शाहू राजे मोगलांच्या कैदेत ऐषारामात वाढलेले असल्याने ते राज्यकारभाराच्या बाबतीत निष्क्रीयच राहिले. सर्व सत्ता पेशव्यांच्या हाती गेली. पुढे शाहू राजांच्या नंतर सातारच्या गादीवर आलेले छत्रपती आगदीच दुबळे होते. त्यामुळे पेशव्यांची सत्ता निरंकुश बनली. पुढे 1818 मध्ये पेशवाई नष्ट झाल्यानंतर इंग्रजांनी मराठयांचा रोष राहू नये म्हणून साताऱ्याचे वेगळे लहानसे राज्य निर्माण करुन ते छत्रपती प्रतापसिहांच्या ताब्यात दिले. पुढे इंग्रज रेसिडेंट व प्रतापसिंह यांचे पटेनासे झाले. प्रतापसिंहावर राजद्रोहाचा आरोप ठेवून 5 सप्टेंबर 1839 मध्ये त्यांना पदच्यूत करण्यात आले व त्यांचे बंधू शहाजी यांना सातारच्या गादीवर बसविले गेले. शहाजी व्यसनी व दुराचारी होता. दि.5.4.1848 रोजी शहाजी मृत्यु पावला. मृत्युपुर्वी त्याने घेतलेला दत्तक इंग्रजानी नामंजूर करुन सातारचे राज्य खालसा केले.26 अशाप्रकारे हा प्रदेश पारतंत्र्याच्या अंधारात बुडून गेला असे म्हणता येईल.

## :::::::::: थोर पुरुषांचा जिल्हा ::::::::::

सातारा जिल्ह्याचा परिसर सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाच्या दृष्टीने पुर्वीपासूनच इतर प्रदेशाच्या मानाने पुढे असल्याचे आढळते. या प्रदेशात अनेक क्षेत्रात प्रभावीपणे कार्यकरणारी नर रत्ने होवून गेल्याचे आढळते.

संत सखू कराडच्या आध्यात्मिक वैभवाचे सौभाग्य आहे. तर छ.शिवरायांच्या

अष्टप्रधान मंडळातील झुंजार सेनापती हंबीरराव मोहिते हे तळबीड गावचे वतनदार पाटील होते. ग्वॉल्हेर येथील शिंदे घराण्याचे संस्थापक राणोजी शिंदे हे येथील कण्हेर–खेड गावचे रहिवाशी होते. शिवकाळातील प्रसिध्द मुत्सद्दी रघुनाथपंत हणमंते हे तारळे गावचे होते. छ.शाहूंचे व पेशव्याचे गुरु ब्रह्मेंद्रस्वामी हे धावडशी गावचे रहिवाशी होते.27 ज्ञानेश्वर महारांजाचे परमभक्त हैबतराव पवार हे अरफळ गावचे राहणारे होते.

याच परिसरात सवादयाचे संत बाबा महाराज व कोळे गावचे संत घाडगेबाबा हे भागवत धर्मी संत होवून गेले. तसेच सुप्रसिध्द ढोलकी वादक नाना मनवेंकर हे येथील मनू गावचे होत. थोर साहित्यिक व लोकशाहीर आण्णा भाऊ साठे हे वाटेगावचे राहणारे होते. तसेच सत्यशोधक चळवळीचा प्रभावी प्रसार करणारा रामु घाडगे हा येथील काले गावचा राहाणारा होता. 28 सर्वांगीण सुधारणा बाबाचा आग्रह धरणाऱ्या गोपाळराव आगरकरांची जन्मभूमी टेंबू याच परिसरात आहे. कर्मवीर भाऊराव पाटलानी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली ती काले या गावी. अस्पृश्य, स्त्रियांचे उध्दारकर्ते म.फुले हे कटगुंणचे. अशाप्रकारे स्वातंत्र्यपुर्व काळात प्रत्येक कार्यक्षेत्रात प्रभावी पणे कार्य करणारी थोर नररत्ने सातारा जिल्ह्यात होवून गेली.

वरील सामाजिक व राजकीय नेत्यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून दादासाहेब उंडाळकरानी उंडाळे परिसरात सामाजिक व राजकीय कार्य केले. तसेच स्वतःला चळवळीत झोकून दिले.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## उंडाळे गावाची पार्श्वभूमी

दादासाहेब उंडाळकर ज्या गावाचे रहिवाशी होते त्या उंडाळे गावाची पार्श्वभूमी पहाणे या ठिकाणी आवश्यक ठरते.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील उंडाळे हे गाव दक्षिण मांड नदीच्या तीरावर वसले आहे. उंडाळे गावचा इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला असता त्यातून एक कथा जन्म घेते त्या प्रमाणे –

काही शतका पुर्वी उंडाळे हे गाव तसे माळी समाजाच्या लोकांचे गाव होते. जात्याच ते माळी असल्याने ते शेती उत्तम प्रकारे पिकवित होते. उंडाळे गावाच्या पश्चिमेला हुमणेवाडी नावाचे एक गाव होते. तेथे हुमणे आडनावाचे लोक रहात होते. हे हुमणे आडदांड आणि अन्यायी प्रवृत्तीचे लोक होते. माळयानी पिकविलेल्या शेतीचे ते नुकसान करीत. त्यांच्यावर अत्याचार करुन त्यांच्या संपत्तीची लूट करीत असत. त्यामुळे येथील माळी समाज हुमण्यांच्या जाचाने पुर्णपणे त्रासून गेला होता. या माळी समाजातीलच काही लोक पंढरपूरला श्री विठ्ठलाच्या यात्रेला जात असत. त्याकाळी पंढरपूरला जाताना कराड–कडेगांव–कडेपूर–विटा–तरसवाडी घाट–दिघंची या मार्गे जावे लागत असे. त्यामुळे पंढरपूरला जाणा–या या माळी लोकांचा वाटेत अनेक ठिकाणी मुक्काम पडत असे. अशाच काळी माळी समाजातील भक्ताचा मुक्काम कडेपूर येथे पडला होता. तेथील स्थानिक लोकांच्या बरोबर या लोकांच्या गप्पा झाल्या असतील. त्यात या लोकांनी आपण हुमण्यांच्या पासून होणाऱ्या जाचाने कसे कंटाळून गेलो आहोत हे तेथील यादवांच्या लोकांना सांगितले असेल व तेथील यादव कुटूंबाना आपले रक्षण करण्याची त्यानी विनंती केली असावी. त्यातून काही यादव उंडाळयाला

माळयांच्या रक्षणाला आले. माळयांनी यादवांना गावाच्या उत्तरेकडील जमीन इनाम म्हणून आजही प्रसिध्द आहे. या यादव बंधूनी उंडाळयात येऊन येथील माळी समाजाला त्रास देणाऱ्या हुमण्यांचा पूरा बिमोड केला. हुमणे त्यांची जमीन सोडून पळून गेले? एकही हुमणे तेथे अस्तिवात राहिला नाही. तेथे वाडीचे अस्तित्व आज अजिबात दिसत नाही. तेथेही यादव लोकांनी आपली शेती करावयास सुरुवात केली. या जमिनीला आजही हुमण्यांच्या वाडीची जमीन असे म्हटले जाते. पुढे याच यादवांनी आपले नामकरण यादव-पाटील असे करुन घेतले. शेवटी त्यांचे आडनाव पाटील एवढेच राहिले. असा या गावाचा थोडक्यात इतिहास आहे. 29

आज हे गाव महाराष्ट्रातील इतर अनेक प्रातिनिधीक खेडयाप्रमाणे अस्तित्वात आले आहे. या गावातील माणसे एकमेकाशी नेहमी गुण्या-गोविंदाने राहिली. या गावातील मागील पिढी पुढील आर्दशाने जगण्याची शिकवण देते. त्यातूनच या गावातील नवी पिढी तयार होत गेली. व हे गाव महाराष्ट्रातील काही मोजक्या आदर्श गावप्रमाणे आदर्श गाव या यादीत जावून बसले. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्योत्तर काळात या गावाला "आदर्श ग्राम" हा पुरस्कार ही प्राप्त झाला. 30

अशा या गावामध्ये महात्मा गांधीजींच्या सत्य-अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे स्वातंत्र्य सैनिक व सामाजिक कार्य करणारे समाज सेवक दादासाहेब उंडाळकर यांच्या सारख्या नररत्नाचा जन्म झाला. या नररत्नाने आपल्या अलौकीक कार्याने उंडाळे गावाला भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात मानाचे स्थान प्राप्त करुन दिले असे म्हणता येईल.

## संदर्भ


1) पाटील रा.तु. — पृ.क्र. 10
यशवंतराव चव्हाण एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी

2) गॅझेटियर सातारा प्रकरण – 1 — पृ.क्र. 2

3) कित्ता — पृ.क्र. 11

4) कित्ता — पृ.क्र. 12, 13

5) सामान्य भूगोल – सातारा जिल्हा — पृ.क्र. 63

6) गॅझेटियर सातारा प्रकरण – 1 — पृ.क्र. 28

7) डॉ. दास्ताने संतोष महाराष्ट्र – 1993 — पृ.क्र. 257

8) माटे गो.रा. – असा घडला सातारा जिल्हा — पृ.क्र. 109

9) कित्ता — पृ.क्र. 6

10) कित्ता — पृ.क्र. 128

11) कित्ता — पृ.क्र. 131

12) कित्ता — पृ.क्र. 133

13) गॅझेटियर सातारा प्रकरण – 5 — पृ.क्र. 381

14) सामान्य भूगोल – सातारा जिल्हा — पृ.क्र. 72

15) गॅझेटियर सातारा प्रकरण – 7 — पृ.क्र. 507

16) कित्ता — पृ.क्र. 509

17) कित्ता — पृ.क्र. 510

18) कित्ता — पृ.क्र. 511

19) कित्ता — पृ.क्र. 514

20) कित्ता पृ.क्र. 530

21) माटे गो.रा. – असा घडला सातारा जिल्हा पृ.क्र. 81

22) कित्ता पृ.क्र. 87

23) कित्ता पृ.क्र. 89

24) कित्ता पृ.क्र. 98

25) गॅझेटियर सातारा प्रकरण – 2 पृ.क्र. 55

26) माटे गो.रा. – असा घडला सातारा जिल्हा पृ.क्र. 73

27) कित्ता पृ.क्र. 141

28) थोरात संभाजीराव, स्वागताध्यक्षीय भाषण समाज प्रबोधन मराठी साहित्य संमेलन, उंडाळे – 1991 संपादक – विठ्ठल पाटील, डॉ. कन्हैया कुंदप. क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ.क्र. 79

29) प्रा. पाटील प्रकाश – समाज प्रबोधनाची आव्हाने पृ.क्र. 2

30) कित्ता पृ.क्र. 3